# जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

दुरध्वनी क्र. ०२३५२-२२०३४१ ई-मेल :-sbmzpratnagiri३@gmail.com


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.रजिप/पावस्व/जर्जीमि/आय.ई.सी./फोमशीट फलक/दरपत्रक सुचना/ २११ /२०२३, दि.२८/०२/२०२३

## - सुचना -

**विषय :- दरपत्रके मागविणेबाबत..**
**संदर्भ :- मा.मु.का.अ., जि.प.रत्नागिरी यांची मंजूर टिपणी दि.२८/०२/२०२३**

जल जीवन मिशन कार्यक्रम हे महत्वकांक्षी जिल्हामध्ये राबविले जात आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे लक्ष आहे. गावातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधाच्या भांडवली किंमतीच्या ५% किंवा १०% लोकवर्गणी(आर्थिक/ श्रमदान स्वरुपात) ग्रामस्थानी ग्रामपंचायतमध्ये भरणे आवश्यक आहे. सदरची लोकवर्गणी ग्रामस्थांना भरण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी जिल्हयामधील ८४६ ग्रामपंचायतीमधील प्रथम दर्शनी भागात लोकवर्गणीची माहिती दर्शविणारे फोमशीट फलक तयार करून बसविण्याचे आहे. त्यानुसार फोमशीट फलक तयार करून बसविण्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | ग्रा.पं. संख्या | प्रति दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | **फोम शीट फलक तयार करणे व बसविणे**<br>• आकार - ३ X २ = ६ स्वे.फूट<br>• फोमशीट ५ एम.एम.<br>• व्हीनायल - स्टॅर हॉय ग्लोसी प्रिंटींग ॲण्ड डिझाईन<br>• फोमशीट फलक ८४६ ग्रा.पं. मध्ये बसविणे.<br>• सर्व फलकाचे जियो टॅगींग करणे व हार्ड कॉपीमध्ये अल्बम तयार करून देणे.<br>• ग्रा.पं.मध्ये फोम शीट फलक बसविणेबाबतचा प्रमाणपत्र सरपंच किंवा ग्रामसेवक याच्या सही शिक्याने या कार्यालकडे सादर करणे. | ८४६ | | |
| | **एकुण -** | | | |

वरील नमुद केल्याप्रमाणे दिनांक ०८ /०३ /२०२३ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रकांचे लखोटे या कार्यालयाकडे सादर करणेत यावेत. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०८/०३/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. या कार्यालयात उघडली जातील. सदर दरपत्रके उघडताना आपण स्वत: किंवा आपला प्रतिनिधी उपस्थित राहील असे पहावे.

**अटी व शर्ती :-**

१) दरपत्रक, हे वर नमुद केलेल्या वेळेनुसारच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.रत्नागिरी येथे सादर करावे.
२) पुरवठादाराकडून मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही.
३) पुरवठा आदेश दिल्यानंतर या कार्यालयाकडून कोणतेही अग्रिम देण्यात येणार नाही.
४) आपण दरपत्रकात नमुद केलेले दर हे सर्व करासहीत राहतील. त्यानंतरच संबंधीतांची देयके अदा केली जातील.
५) दरपत्रकासोबत पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे.
६) दरपत्रक स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक (पा.वस्व.) यांचे राहतील.

प्रकल्प संचालक (पा.वस्व.)
जिल्हा परिषद रत्नागिरी.

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा परिषद रत्नागिरी
# जल जीवन मिशन

हर घर जल
जल जीवन मिशन



## लोकवर्गणी कशासाठी..?

योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी...


निरंतर पाणीपुरवठ्यासाठी...

योजनेच्या शाश्वततेसाठी...

गावांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या १०% रक्कम संबंधीत अटी व शर्तींच्या अधीन राहुन प्रोत्साहनपर फिरता निधी मिळविण्यासाठी...

## लोकवर्गणीबाबत महत्वाचे मुद्दे

- लोकवर्गणी पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा केली जावी.
- कमीतकमी ८०% कुटुंबांकडून लोकवर्गणी जमा केली जावी.
- आवश्यकतेनुसार लोकवर्गणी हफ्त्याने जमा करण्याची मुभा ग्रामपंचायत देऊ शकते.
- गरज भासल्यास काही कुटुंबांना (आर्थिक दुर्बल घटक इ) लोकवर्गणी माफ करण्याचा निर्णय ग्रामपंचायत घेऊ शकते.




**लोकवर्गणी आपण आर्थिक किंवा श्रमदान स्वरुपात भरु शकतो.**

**आता सांगा तुम्ही लोकवर्गणी केव्हा भरणार...!**

Scanned with OKEN Scanner